# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.05.2025** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज गुजरातमधील गांधीनगर इथं विविध विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आज मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करणार
3. केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज मुंबई विद्यापीठामध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अध्ययन आणि संशोधन केंद्राचं होणार उद्घाटन आणि
4. कर्नाटक, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी आज मुसळधार ते पावसाचा अंदाज

**<u>पंतप्रधान-गुजरात दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. त्यांच्या हस्ते आज गुजरातमधील गांधीनगर इथल्या महात्मा मंदिर इथं साडेपाच हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे. यामध्ये शहरी विकास, पायाभूत सुविधा, जलस्रोत व्यवस्थापन, आरोग्य आणि महसूल सेवा यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

गांधीनगरमध्ये होणाऱ्या गुजरात शहरी विकास कार्यक्रमाच्या द्वीदशकपूर्तीनिमित्त आयोजित एका विशेष कार्यक्रमात मोदी सहभागी होणार आहेत. 2005 मध्ये पंतप्रधान मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना पायाभूत सुविधा, उत्तम प्रशासन आणि शहरी नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करून शहरी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला होता. 2025 या वर्षातल्या शहरी विकास कार्यक्रमालाही मोदींच्या हस्ते प्रारंभ होणार आहे.

यावेळी शहरी विकास योजना आणि शाश्वत राहणीमान आणि हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी राज्य स्वच्छ हवा कार्यक्रमाची सुरुवातही मोदींच्या हस्ते होईल. यावेळी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 22 हजारहून अधिक लाभार्थ्यांना घरांचे वाटप होणार आहे. स्वर्णिम जयंती मुख्यमंत्री शहरी विकास योजनेअंतर्गत गुजरातमधील नागरी स्थानिक संस्थांना तेहेतीसशे कोटी रुपयांचा निधी देखील पंतप्रधान जारी करतील.

**<u>मोदी भूज</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल भुज इथल्या कार्यक्रमामध्ये पाकिस्तानवर जोरदार टीका केली. भारत लोकांना एकमेकांशी जोडणाऱ्या पर्यटनाला प्रोत्साहन देत असताना पाकिस्तान मात्र दहशतवादाला प्रोत्साहन देत आहे. स्वतःच्या फायद्यासाठी देशातील तरुणांचं भविष्य नष्ट करण्याचा पाकिस्तानचा उद्योग सुरू आहे, अशी टीका मोदी यांनी केली. ऑपरेशन सिंदूरमुळे भारताचं दहशतवादाविरुद्धचं शून्य सहिष्णूता धोरण पूर्णपणे स्पष्ट झालं आहे. ऑपरेशन सिंदूर हे मानवतेचं रक्षण करणारं आणि दहशतवाद समाप्त करण्यासाठीचं अभियान आहे. भारताची लढाई सीमेपलीकडे असलेल्या दहशतवादाविरुद्ध आहे, असंही मोदी यांनी स्पष्ट केलं.

**मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात विविध मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करणार आहेत. या वर्षी सरकारनं 139 पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून त्यामध्ये 7 पद्म विभूषण, 19 पद्म भूषण आणि 113 पद्मश्री सन्मानांचा समावेश आहे. पहिल्या समारंभात राष्ट्रपतींनी 71 पद्म सन्मान प्रदान केले. आजच्या दुसऱ्या समारंभात 68 व्यक्तींना पद्म सन्मान प्रदान करण्यात येतील.

**अमित शहा-महाराष्ट्र दौरा**

सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज मुंबईमध्ये असून त्यांच्या हस्ते आज  मुंबई विद्यापीठामध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अध्ययन आणि संशोधन केंद्राचं उद्घाटन होणार आहे.   अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल आणि विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती सी. पी. राधाकृष्णन असतील. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या 142 व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या विशेष व्याख्यानाचं आयोजनही करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार वितरण समारंभही अमित शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**राजनाथ सिंह आढावा**

केंद्र सरकार संरक्षण सामग्री उद्योगांचा पाया मजबूत करण्यासाठी तसंच संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांमध्ये स्पर्धात्मका वाढवण्यासाठी वचनबद्ध असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. सिंह यांनी काल दिल्लीत संरक्षण सामग्री उद्योगांच्या कामगिरीचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय सशस्त्र दलांच्या सज्जतेचं दर्शन घडवणारं तंत्रज्ञान ठळकपणे समोर आलं; हे तंत्रज्ञान विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बाजवणाऱ्या संरक्षण उद्योगांचं सिंह यांनी कौतुक केलं. अलीकडील भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेता, संरक्षण सार्वजनिक उपक्रमांनी आधुनिक युद्धाच्या उदयोन्मुख क्षेत्रात संशोधन, विकासावर लक्ष केंद्रीत करून नवीनतम तंत्रज्ञानाच्या उत्पादनात वाढ करणे तसेच ही उत्पादने सशस्त्र दलांपर्यंत वेळेवर पोहोचवण्यावर लक्ष केंद्रीत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

**मोदी 11 वर्षे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीला काल अकरा वर्ष पूर्ण झाली. 2014 मध्ये 26 मे रोजी त्यांनी पहिल्यांदा पंतप्रधानपदाची शपथ ग्रहण केली होती. देशाच्या आधुनिक राजकीय इतिहासातला हा महत्त्वाचा टप्पा होता. 2014 च्या निवडणुकांमध्ये भाजपला स्पष्ट आणि निर्णायक बहुमत मिळाल्याने आघाडीच्या राजकारणाच्या युगाला पूर्णविराम मिळाला.

**शिष्टमंडळ भेटी**

भारताच्या दहशतवादाविरोधातील शून्य सहिष्णूतेचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळ सध्या विविध देशांच्या भेटीवर आहेत. भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने काल फ्रान्समध्ये भारतीय समुदायाशी संवाद साधला. दहशवादविरोधी लढ्यात संपूर्ण देशाची एकजूट असल्याचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्याच्या प्रयत्नातील एक भाग असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. या शिष्टमंडळातील राज्यसभेचे खासदार गुलाम नबी आझाद यांनी भारताला शेजारी देशाबरोबर शांतता हवी असली तरीही हल्ला झाल्यास भारत शांत राहाणार नाही असं त्यांनी स्पष्ट केले. हे शिष्टमंडळ पुढे इटली, युके, जर्मनी, डेन्मार्क आणि युरोपियन युनियनला भेट देणार आहे.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे सदस्य भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांनी गयानाच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांची भेट घेऊन दहशतवादा विरोधातील भारताची भूमिका स्पष्ट केली. पाकिस्तानच्या स्थापनेपासूनच त्यांनी भारताविरूद्ध सुरू केलेल्या कुरपतीविषयी तेजस्वी सूर्या यांनी माहिती दिली.

खासदार श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली दोन शिष्टमंडळानीही काल दक्षिण कोरिया, कुवेत, कतार, काँगो आणि स्लोव्हेनिया आदी विविध देशांच्या भेटी घेऊन दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट केली.

**<u>मिस्री-अमेरिका</u>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आजपासून तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत. या भेटीत ते वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेच्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेतील.

**<u>राज्यसभा-निवडणूक</u>**

राज्यसभेच्या आठ जागांसाठी निवडणूक आयोगाने द्वैवार्षिक निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. तामिळनाडूमधील सहा आणि आसाममधील दोन जागांचा यात समावेश आहे. जून महिन्याच्या दोन तारखेला निवडणुकीची अधिसूचना जारी करण्यात येईल आणि 19 जूनला मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणी देखील होईल. राज्यसभेच्या आठ सदस्यांचा कार्यकाळ जून जुलै दरम्यान संपणार आहे.

**<u>मालदीव-परराष्ट्रमंत्री</u>**

मालदीवचे परराष्ट्र मंत्री डॉ. अब्दुल्ला खलील यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. भारताच्या दहशतवादाविरोधातल्या सर्व प्रकारच्या लढाईत भारताला ठाम पाठिंबा असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. डॉ. खलील तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. या भेटीदरम्यान त्यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्याशी परस्पर हिताच्या मुद्द्यावर द्वीपक्षीय चर्चा केली. तसेच दुसऱ्या भारत-मालदीव उच्चस्तरीय गाभा समितीच्या बैठकीतही सहभागी झाले.

**<u>विज्ञान परिषद</u>**

येत्या ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या इंडिया मोबाईल काँग्रेसच्या नवव्या आवृत्तीसाठी 'इनोव्हेट टू ट्रान्सफॉर्म' ही संकल्पना केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते काल सादर करण्यात आली. यंदाची संकल्पना ही भविष्यवेधी असून, उद्योग आणि पायाभूत सुविधांपासून समाज आणि आणि शाश्वतता पर्यंतच्या क्षेत्रांमध्ये वास्तववादी, परिवर्तनकारी बदल घडवून आणण्याच्या नवोन्मेषाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करणारी असल्याचं प्रतिपादन शिंदे यांनी केलं. इंडिया मोबाइल काँग्रेस 8 ते 11 ऑक्टोबर 2025 दरम्यान नवी दिल्ली येथे आयोजित केली जाणार आहे.

**<u>पॅराॲथलेटिक्स</u>**

स्वित्झर्लंडमध्ये सुरू असलेल्या नॉटविल वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स ग्रांप्रीमध्ये भारतीय पॅराॲथलीट महेंद्र गुर्जरने काल पुरूषांच्या भालाफेक F42 प्रकारात नवा विश्वविक्रम प्रस्थापित करून इतिहास रचला आहे. त्याने 61 पूर्णांक 17 मीटर फेक करत सुवर्णपदकाला गवसणी घातली.

**<u>आएसएसएफ</u>**

जर्मनीत सुरू असलेल्या आयएसएसएफ कनिष्ठ विश्वकरंडक स्पर्धेत, भारतीय नेमबाज तेजस्विनीने महिलांच्या 25 मीटर स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारताने तीन सुवर्ण, चार रौप्य आणि चार कास्यपदकासह अकरा पदके मिळवून आघाडीवर आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने आज कर्नाटक, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. छत्तीसगड, केरळ, पश्चिम बंगाल, मराठवाडा, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, अंदमान निकोबार बेटे, ओडिशा आणि ईशान्येकडी राज्यातही येत्या दोन ते तीन दिवसात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

तर हिमाचल प्रदेश, दिल्ली, आंध्र प्रदेश, राजस्थान, हरियाणा, चंदीगड, ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागात विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळाचा अंदाज वर्तवला आहे. आज हिमाचल प्रदेशात गारपीट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर पश्चिम राजस्थानमधील काही ठिकाणी दिवसा उष्णतेच्या लाटा आणि धुळीचे वादळ येऊ शकतात, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**